दै. सामना दि. 16/02/25

# गोळीबार करणाऱ्याला मदत करणाऱ्या दोघांना २० फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी

**नांदेड, दि. १५ (प्रतिनिधी) - पॅरोलवर सुटलेल्या एका आरोपीवर गोळीबार केल्याप्रकरणी गोळीबार करणाऱ्याला मदत केलेल्या दोन जणांना नांदेड पोलिसांनी अटक केली होती. त्यांना अटक केल्यानंतर मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी २० फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत पाठविले आहे.**

१० फेब्रुवारी रोजी गुरुद्वारा परिसरातील गेट क्र.६ समोर एका हल्लेखोराने आपल्या पिस्तुलातून दोघांवर गोळीबार केला होता. त्यात रविंद्रसिंघ राठोड याचा मृत्यू झाला, तर पॅरोलवर सुटलेला आरोपी गुरमितसिंघ सेवादार हा गंभीर जखमी झाला. या प्रकरणात पोलिसांनी संबंधित गोळीबार करणाऱ्या आरोपीचा शोध सुरु केला. तसेच त्याला मदत करणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरु झाला. वजिराबाद पोलिसांनी मनप्रीतसिंघ उर्फ मन्नू गुरुबक्षसिंघ ढिल्लो आणि हरप्रीतसिंघ उर्फ हॅप्पी बाबूसिंघ कारपेंटर या दोघांना अटक केली होती. वजिराबाद पोलिसांनी त्यांना न्यायालयासमोर हजर केल्यानंतर या दोन्ही आरोपींना २० फेब्रुवारीपर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचे धागेदोरे शोधण्याचे काम सुरु असून, हल्लेखोरास अटक करण्यासाठी वेगवेगळी पथके तैनात करण्यात आली आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार हे या प्रकरणात स्वत: लक्ष घालून तपास करत आहेत.